# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 13 March 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ मार्च २०२४ दुपारी १.०० वा.

****

केंद्र सरकारने एक देश एक निवडणूक यावर अभ्यास करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीनं आज आपला अहवाल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे सोपवला. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने २०२९ ची लोकसभा निवडणूक आणि विधानसभा निवडणूक एकाचवेळी घेण्याची शिफारस केली आहे. रामनाथ कोविंद यांनी राष्ट्रपतींकडे अहवाल सोपवला त्यावेळी देशाचे गृहमंत्री अमित शहा देखील उपस्थित होते.

****

ओटीटी प्लॅटफॉर्मवर सातत्याने आक्षेपार्ह माहिती प्रसारित करणाऱ्यांवर केंद्रीय माहिती प्रसारण मंत्रालयानं आज कठोर कारवाई केली. अशाप्रकारे आक्षेपार्ह माहिती प्रसारित करणाऱ्या १९ साईट्स, १० ॲप आणि ५७ सोशल मीडिया हँडलर्सचे प्रसारण देशपातळीवर रोखण्यात आलं आहे.

****

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनं शरद पवार यांचं नाव किंवा त्यांचं छायाचित्र वापरणार नाही असं शपथ पत्र द्यावं असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं अजित पवार गटाला दिले आहेत.

अजित पवार गट अद्यापही मतदारांना मत देण्याचं आवाहन करताना शरद पवार यांचं नाव आणि छायाचित्र यांचा वापर करत असल्याची तक्रार याचिका शरद पवार गटानं केली होती. अजित पवार गटाला सर्वोच्च न्यायालयानं याबाबत फटकारलं आहे. आता अजित पवार गटाची स्वतंत्र ओळख असून या ओळखीसह या गटानं मतदारांसमोर जावं असं न्यायालयानं म्हटलं आहे. या याचिकेची पुढील सुनावणी येत्या १९ मार्च ला होणार आहे.

****

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज रत्नागिरीच्या दौऱ्यावर आहेत. रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचं भूमिपूजन, पोलीस वसाहतीच्या नवीन इमारतीचं भूमिपूजन आज त्यांच्या हस्ते होणार असून दुपारी दीड ते तीन वाजण्याच्या दरम्यान हे कार्यक्रम होतील.

****

माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना तातडीने उपचारासाठी पुण्यातील भारती रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. ८९ वर्षांच्या प्रतिभाताईं यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. काही दिवसांपासून त्या आजारी आहेत. बुधवारी त्यांना अधिकच अस्वस्थ वाटू लागल्याने कुटुंबियांनी त्यांना रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं.

****

पेटीएमचा वापर फास्ट टॅग साठी करणाऱ्या नागरिकांनी उद्या १५ मार्चच्या आधी अन्य बँकेच्या फास्टटॅग सुविधेचा वापर सुरु करावा असं भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण एन एच आय नं म्हटलं आहे. अन्य बँकेच्या सुविधांच्या वापरामुळे फास्टटॅग वापरकर्त्यांचा दंड आकारणी तसंच राष्ट्रीय राजमार्गांवर प्रवासादरम्यान दुप्पट शुल्क भरणं यापासून बचाव होणार आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दिशा निर्देशांनुसार उद्या १५ तारखेनंतर पेटीएम बँकेचं फास्टटॅगचं रिचार्ज किंवा टॉप अप करता येणार नाही.

****

जागतिक महिला दिनाच्या औचित्यानं छत्रपती संभाजीनगर इथे महिला मंडळ छत्रपती संभाजीनगर, लायन्स क्लब मेट्रो आणि लायन्स क्लब सिडको छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमानं कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. शहरातील शिशुविकास माध्यमिक शाळेत आज दुपारी ४ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमात सहाय्यक पोलीस निरीक्षक मोक्षदा पाटील  सायबर गुन्हे- मुलींचं स्वसंरक्षण आणि पालकांचा सहभाग या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

****

बीड जिल्ह्यात गेवराई तालुक्यातल्या तलवाडा इथं पोलिसांनी बेकायदेशीर हातभट्टी मद्य तयार करण्यासाठीची रसायनं आणि अन्य साहित्य काल उध्वस्त केलं. तलवाडा इथे पत्र्याच्या शेड च्या आडोश्यात बेकायदेशीर आणि घातक रसायनांचा वापर करुन हातभट्टीची दारु तयार होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलीसांनी ही कारवाई केली असून या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

रायगड जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून पोलीस दलाला एक कोटी ९१ लाख रुपये किमतीची १५ वाहनं उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. रस्ते अपघातासंदर्भातील किट तसंच साधन सामुग्री खरेदीकरिता दोन कोटी रुपये, बॉम्बशोधक आणि नाशक पथक साहित्य खरेदीसाठी १० लाख रुपये आणि शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी २३ लाख रुपये असा एकूण चार कोटी २३ लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे. त्यामुळे रायगड पोलीस दलाचा कारभार गतिमान होण्यास मदत होणार आहे.

रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते वाहनांचं वितरण पोलिसांना करण्यात आलं. पुढच्या वर्षी माणगाव, खोपोली, पेण, उरण इथे सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी सहा कोटी ४० लाख देण्यात येणार असल्याचं पालकमंत्री सामंत यांनी यावेळी सांगितलं.

****